निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८५ वा
गुरुवार -२९ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## संक्षिप्त

### आदिवासी विकास विभागातील गृहपाल पदाच्या भरतीची कागदपत्र तपासणी ३० मे रोजी

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग अमरावती विभागातील गृहपाल (पुरूष) व गृहपाल (स्त्री) या पदांची मुळ दस्तऐवज, कागदपत्र पडताळणीसाठी ३० मे, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, टी.बी. हॉस्पीटलच्या मागे, अमरावती या ठिकाणी https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील उमेदवारांनी ऑनलाईन केलेला अर्ज व ऑनलाईन अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने सर्व मुळ दस्ताऐवज व २ छायांकित प्रतीसह उपस्थित राहण्याची नोंद घ्यावी तसेच सदर यादीतील उमेदवारांचा समावेश म्हणजे आदिवासी विकास आयुक्तालयाद्वारे नोकरीची हमी नव्हे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी असे प्रादेशिक निवड समितीचे अध्यक्ष तथा अपर आयुक्त जितेंद्र एन.चौधरी यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### पिशोर नाचनवेल करंजखेडा चिंचोली परिसरातील ट्रॅक्टर चालक व मालक सावधान पोलिसांची आपल्यावर करडी नजर

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील पिशोर नाचन-वेल चिचोंली करंजखेडा वासडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या अनेक दिवसांपासून बांधावरचे भांडण हे जवळपास ट्रॅक्टरने बांध फोडल्यामुळे होत असल्याच्या घटना घडत आहेत. तसेच ट्रॅक्टरवर साऊंड व कर्कश आवाजाचे हॉर्न असल्याने ट्रॅक्टर व दुचाकीस्वारांचे अनेक अपघात हे ट्रॅक्टरमुळे घडले.

या गोष्टीला आळा घालण्यासाठी पोलीस ठाण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन पत्रकारांशी संवाद साधून ट्रॅक्टर चालक व मालक यांनी आपल्या वाहन चालकाला व ट्रॅक्टर मालकाला आव्हान केले की आपला वाहन चालक हा परवानाधारक असणे गरजेचे आहे त्याच्याकडे वाहन चालकाकडे परवाना बंधनकारक राहील तसेच ट्रॅक्टर वर साऊंड बसवलेले लवकरात लवकर काढण्याचे आवाहन केले. दोन दिवसाच्या आत ट्रॅक्टर चालक मालक यांनी

या गोष्टी आत्मसात करून प्रशासनाला सहकार्य करावे नसता पुढील दोन दिवसानंतर अशा गोष्टी आढळून आल्यास ट्रॅक्टर चालक व मालक यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच ट्रॅक्टर चालकाने शेतकऱ्यांना जर सांगितले की बांध फोड तरीही त्याने बांध फोडायचा नाही व बांध फुटल्यास दुसऱ्या शेतकऱ्याची पोलीस स्टेशनला तक्रार आली तर ट्रॅक्टर चालकासह मालकालाही सह आरोपी करण्यात येईल याची सर्व ट्रॅक्टर चालक व मालक यांनी नोंद घ्यावी असे आव्हान येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे यांनी केले. यावेळी दुय्यम अधिकारी रतन डोईफोडे, दुय्यम अधिकारी विश्वजीत फरताडे, बिट अंमलदार, विलास सोनवणे, सुनील भिवसने, किरण गंडे, वसंत पाटील, पंढरीनाथ इंगळे, दत्ता लोखंडे, आधी सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### गोवा राज्याचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री दामु नाईक यांची वेरुळ, खुलताबादला भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी/**खुलताबाद तालुक्यातील वेरुळ व खुलताबाद शहरात बुधवारी (दि.२८) भा. ज.पा. चे प्रदेशाध्यक्ष दामु नाईक यांनी भेट देत बारावे ज्योतिर्लिंग श्री घषणेशवर महादेव मंदिर व भद्रा मारोती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांचा भारतीय जनता पार्टीच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,माजी उपसभापती दिनेश अंभोरे,शहराध्यक्ष परसराम बारगळ,माजी नगरसेवक योगेश बारगळ,सुखदेव ठेंगडे, राहुल निकुंभ,प्रभाकर थोरात,तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजना ऑक्टोबर अखेरपर्यंत कार्यान्वीत करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रकस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर शहराची पाणी पुरवठा योजना सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून ऑक्टोबर अखेरपर्यंत कार्यान्वीत करा. तसेच सर्व प्रलंबित कामे तातडीने मार्गी लागण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. योजना १०० टक्के पूर्ण झाल्यानंतरच समाधान होणार आहे. ठेकेदारांना काम करताना येणाऱ्या अडचणी महानगरपालिका आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून सोडवाव्यात आणि ठेकेदारांनीही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्र सामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन करावे अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे छत्रपती संभाजीनगर पाणी पुरवठा योजनेची आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

**सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून योजनेतील प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत**

पाणी पुरवठ्यासाठी जॅकवेल महत्वाचे असून त्याचे काम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून पाणी उपसा सुरू करण्याच्या सूचना देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेतील २६ एम एल डी पाणी पुरवठा करणारा टप्पा जून अखेरपर्यंत पूर्ण करावा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अपूर्ण असलेले काम लवकर होण्याच्या दृष्टीने पूर्व अभियांत्रिकी पद्धतीने काम करण्यास ठेकेदारास तातडीने मान्यता द्यावी. पाईप लाइन टाकण्याच्या कामात गॅप आहेत. ते पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने १५ जून नंतर शटडाउन घ्यावा आणि ठेकेदारांनी ते काम ऑगस्ट अखेर पर्यंत पूर्ण करावे. आरओडब्लूचे काम एक आठवड्यात मार्गी लावावे, ठेकेदाराने किमान ३५ ईएसआर आणि जीएसआर पूर्ण करून द्याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेचे इतके टक्के काम पूर्ण अशी उत्तरे अधिकाऱ्यांकडून अपेक्षित नाहीत. अशा उत्तराने समाधान होणार नाही. १०० टक्के काम पूर्ण झाल्यानेच समाधान होणार आहे. या योजनेतील पाणी पुरवठ्याच्या




टाक्या तातडीने कार्यन्वीत करण्यासाठी ठेकेदाराने नियोजन करावे. ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत या पाणी टाक्यांची कामे पूर्ण करावीत.

यामध्ये येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिकांनी समन्वयाने काम करावे. कामामध्ये खंड पडू नये यासाठी महानगरपालिकेला ८२२ कोटी रुपयांचा कर्ज निधी उभारण्याची मंजुरी तातडीने द्यावी. तसेच याच्या व्याजामध्ये असलेला जास्तीचा दर फरक शासन स्तरावरून भरून द्यावा. पाणी पुरवठ्याचे हायड्रॉलिक टॅप कार्यान्वित करावे आणि त्याची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदारावर असावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण न केल्यास त्याला काळ्या यादीत टाकण्यात येईल. पोलिस, महानगर पालिका आणि जीवन प्राधिकरण यांनी सामन्याने काम करून ही योजना वेळेत पूर्ण करावी. पाणी पुरवठा करणाऱ्या टाक्यांचे काम तातडीने पूर्ण करावे.यावेळी पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी, ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## तुळजापूरच्या श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकाससाठी १ हजार ८६५ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने तुळजापूर येथील श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकासासाठी १ हजार ८६५ कोटी रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली असून त्या संदर्भातील शासननिर्णय आज जारी करण्यात आला आहे. या आराखड्याच्या संनियंत्रण व अंमलबजावणीची जबाबदारी धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सातत्याने यासंबंधीच्या बैठका घेऊन पाठपुरावा केला होता.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून श्रीतुळजाभवानी देवीला महत्वं आहे. देवीच्या साडेतीन शक्तीपिठांपैकी आदिशक्तीचे मूळ स्थान तुळजापूर येथे आहे. देवीच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक मोठ्या संख्येने येत असतात. नवरात्रीच्या काळात मंदिरात मोठा उत्सव, भक्तांची गर्दी असते. ऐतिहासिक, आध्यात्मिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या तुळजाभवानी देवस्थानच्या विकासाच्या दृष्टीने आजचा हा शासन निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेल्या राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय दर्जाची महत्त्वाची स्थळे, तीर्थक्षेत्र परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात घेऊन संबंधित आराखडे नियोजन विभागामार्फत राबवण्यात येतात.



स्थानिक पातळीवरील सर्व संबंधितांशी चर्चा करून श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा व लागणारा निधी याचा आराखडा धाराशिवचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने तयार केला आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता घेण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातच या आराखड्यास प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय नियोजन विभागाने जारी केला आहे. या शासन निर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून ही कामे करून घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. नियोजन विभागाने तत्परतेने जारी केलेल्या या शासननिर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देवीभक्तांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## जनसंख्याशास्त्र, लोकशाही आणि विविधता' हा नवभारताचा आत्मा - उपराष्ट्रपती जगदीप धनखड

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** जनसंख्या विज्ञान, लोकशाही आणि सांस्कृतिक विविधता हे नवभारताचे आत्मिक स्तंभ आहेत. या त्रिसूत्रीचा अभ्यास आणि तिचे संरक्षण ही आजच्या तरुणांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (खखझड) ६५व्या आणि ६६व्या पदवी प्रदान समारंभात केले.



या समारंभात उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ.सुदेश धनखड, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण आणि रसायन व खत मंत्रालय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल, राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार सना मलिक, संस्थेचे संचालक प्रो.डी.ए.नागदेवे आणि विविध शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, ही केवळ पदवी मिळविण्याची वेळ नाही, तर नवभारत घडवण्याच्या जबाबदारीची सुरुवात आहे. भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. आपली लोकशाही, लोकसंख्याशास्त्र आणि विविधता हे घटक भारताच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे दिशादर्शक आहेत.

डेटा म्हणजे देशाचा दिशा-निर्देश

उपराष्ट्रपती धनखड म्हणाले, आधुनिक भारतात लोकसंख्याशास्त्र हे केवळ आकडेवारी नाही, तर ते आपल्या राष्ट्राची ओळख आहे. बेरोजगारी, आरोग्य सेवांतील असमानता, आणि प्रादेशिक असंतुलन या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी योग्य डेटाचा उपयोग अत्यावश्यक आहे. जनसंख्याशास्त्राचे विद्यार्थी, हे बदल घडवू शकता.

सरकारने आगामी जनगणनेत जातीनिहाय माहिती गोळा करण्याचा निर्णय घेतला असून हा निर्णय समाजात समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल, 'खखझड' सारख्या संस्थांना या डेटाचे विश्लेषण करून सर्वसमावेशक धोरणं तयार करण्यासाठी महत्वाचे योगदान देण्याचे आवाहन श्री. धनखड यांनी केले.

लोकशाहीसमोरील आव्हाने

धर्मांतरण आणि अनियंत्रित बेकायदेशीर स्थलांतर हे केवळ सामाजिक प्रश्न नाहीत, तर ही आपल्या लोकशाही आणि अस्तित्वासमोरील गंभीर आव्हाने आहेत. आपली सीमा सुरक्षित ठेवणे, सामाजिक समरसता जपणे आणि सार्वजनिक संवादात प्रामाणिकपणा राखणे हे सर्व एकत्रितपणे लोकशाही टिकवतात.

शांती ही सहिष्णुतेने मिळते, पण तिचे रक्षण शक्तीनेच करता येते. भारताच्या सैन्यदलांनी दाखवलेली रणनीती आणि हे त्याचे उदाहरण आहे, असे ते म्हणाले.

तुमचे शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, तर समाज बदलण्यासाठी आहे. भारताच्या विकासाच्या मार्गात तुम्ही केवळ आकड्यांमध्ये अडकून न पडता, त्या आकड्यांमागची माणसे समजून घेऊन काम करा.

आकडे धोरण ठरवतात, पण लोकच देश घडवतात असेही उपराष्ट्रपती धनखड यांनी सांगितले.

## बोडख्यातील नदीला पूर, नदीच्या काठावरून गावात येण्यासाठी ग्रामस्थांचा ट्रॅक्टरमधून जीवघेणा प्रवास

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनीधी/** मिळालेल्या माहितीनुसार जालन्यातील घनसावंगी तालुक्यात आज मुसळधार पावसानं हजेरी लावली.बोडखा बुद्रुक गावात देखील जोरदार पाऊस झाल्यानं नदीला पूर आला.यामुळे शेतीकाम करण्यासाठी गेलेले ग्रामस्थ नदीकाठी अडकले.नदीला पूर आल्यानं त्यांना काही गावात येता येत नव्हतं.अखेर नदीकाठी अडकून पडलेल्या या ग्रामस्थांना गावात आणण्यासाठी ट्रॅक्टरची मदत घेण्यात आली.या ट्रॅक्टरमध्ये बसून ग्रामस्थ नदीवरील पूल ओलांडून गावात आले खरे पण पुराच्या पाण्यातून ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर टाकत स्वतः सह ग्रामस्थांचा जीव धोक्यात घालून प्रवास केला.



असा प्रवास पुन्हा नको म्हणून गावा शेजाराच्या नदीवर नवीन पूल मंजूर करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# बियाणे व पिक प्रात्यक्षिकासाठी अर्ज मागविले

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित/संकरीत वाणांचे प्रसाराच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे वितरणाचा कार्यक्रम राबविण्यात येतो.

प्रमाणित बियाणे वितरण या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी किमान ०.२० हे ते कमाल १ हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. शेतकऱ्यास महाबीज या बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकामार्फत ७/१२ उताऱ्याच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) तत्त्वावर प्रमाणित बियाणे वितरण करण्यात येणार आहे. तुर, मुग, उडीद १० वर्षाच्या आतील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास ५० रू. किलो प्रमाणे अनुदान असुन १० वर्षाच्या वरील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास २५ रू. किलो प्रमाणे अनुदान देय असते. तुर, मुग, उडीद, बाजरी, मका या पिकांच्या अनुदानावरील बियाण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत सोयाबीन बियाणे ५ वर्षाच्या आतील वाण व भुईमूग बियाणे ५ वर्षाच्या आतील वाण १०० टक्के अनुदानावर उपलब्ध केले जाणार आहे. या साठी महाडीबीटी पोर्टलवर आजपासुन गुरूवारपर्यंत अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांची निवड झालेली आहे त्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर दि.२९रोजी संदेश जातील व यादी प्रसिद्ध होईल. अनुदानावरील बियाण्यासाठी निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांच्या मोबाईलवरील निवड झालेला संदेश व स्वतःचे आधार कार्ड घेवून आपल्या तालुक्यातील शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांच्या वितरकामार्फत शुक्रवारपासुन बियाणे उचल करावे. तालुकानिहाय महाबीजच्या वितरकांच्या याद्या गुरूवारी प्रसिद्ध केल्या जातील.

त्याचप्रमाणे राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत पिक प्रात्यक्षिक बाब राबविण्यात येणार असुन पिक प्रात्यक्षिक ही बाब शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणारी सहकारी संस्था इ. व्दारे राबविण्यात येणार आहे. शेतकरी गट हा ३१ मार्च २०२४ पुर्वी नोंदणीकृत असावा.

पिक प्रात्यक्षिकासाठी MahaDBT पोर्टलव्दारे नोंदणीकृत शेतकरी गट/कंपनी/संस्था निवड ही प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर निवड करण्यात येणार आहे. गटातील शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्यास त्यापैकी फक्त २५ शेतकऱ्यांची या लाभासाठी निवड करावयाची आहे तथापि शेतकरी गटातील एका कुटुंबातील एकच शेतकऱ्यास लाभ देण्यात येणार आहे. शेतकरी गट/कंपनी/संस्था यामधील शेतकऱ्यांना पिक प्रात्यक्षिकाचा लाभ देताना Agristack वर नोंदणी असणे बंधनकारक आहे.जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी/शेतकरी गट/कंपनी आणि संस्था यांनी www.mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.२९ पर्यंत अर्ज करावेत व अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

## रुपाली चाकणकरांचा तोल सुटला

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणावरुन राज्यभरात संतापाची लाट पसरली असून महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना देखील लक्ष्य केलं जात आहे. रुपाली चाकणकर यांनी वैष्णवीच्या माहेरी म्हणजेच अनिल कस्पटे यांच्या घरी भेट देत कुटुंबीयांचं सांत्वन केलं. तसेच, याप्रकरणी महिला आयोग आपल्या पाठीशी असून पोलीस योग्य ती कारवाई करत असल्याचेही सांगितले. मात्र, या भेटीदरम्यान काही महिलांनी व मराठा युवकांनी रुपाली चाकणकर यांना अडवून जाब विचारला. महिला आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर, रुपाली चाकणकर यांनीही आता अति होतंय, म्हणत त्यांना फटाकरले. तर, शिवसेना नेत्या सुषमा अंधारे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसेंकडूनही रुपाली चाकणकरांना लक्ष्य केलं जात आहे. त्यातच, आता त्यांच्याच पक्षातील महिला नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी देखील रुपाली चाकणकरांचा तोल सुटल्याचे म्हटले.

रुपाली चाकणकर यांचा तोल सुटला, कारण त्यांनी प्रशासनात कधी कामच केलेलं नाही, ना त्या निवडून आलेल्या आहेत. त्यामुळे, हे कशा पद्धतीने हँडल करायचं ही कमतरता दिसून आली, त्यामुले हे दिसून आलं, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातील नेत्या रुपाली ठोंबर यांनी थेट पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षांवरच टीका केलीय. कस्पटे यांच्या घरी गेल्यानंतर विरोधकांना चिल्लर म्हणणं योग्य नाही. आज ते विरोधक आहेत, कधी आम्ही विरोधक होतो तेव्हा आम्हीही सरकारला घेरायचो. त्यांनी प्रेस घेऊन सांगितलं असतं, त्यांनी केलेली कामे सांगितली असती तर विरोधक गपगार झाले असते. पण, विरोधकांना चिल्लर आणि शून्य किंमत अशी वक्तव्य संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने केल्यामुळे पुढील वाद वाढला, असेही रुपाली ठोंबरंनी म्हटले.

वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर राज्यातील महिला आयोगाकडून होत असलेल्या दिरंगाईवर आणि दुटप्पी वागणुकीवर टीका होत असून मविआतील महिला नेत्यांकडून रुपाली चाकणकर यांना लक्ष्य केलं जात आहे. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तर,रुपाली ठोंबरे यांनी वैष्णवीचे बाळ तिच्या आई-वडिलांकडे मिळवून देण्यासाठी पुढाकार घेत दाखवलेल्या संवेदनशीलतेबाबत त्यांचं कौतुकही केलंय. दरम्यान, वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात अजित पवारांनी एका भाषणात दम भरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी फरार राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणेंना पोलिसांनी अटक केली होती. तर, त्यांना फरार होण्यासाठी मदत करणाऱ्या ५ जणांना देखील पोलिसांनी अटक केली होती.

## अभिनेते अशोक सराफ यांना पद्मश्री

**आत्ताच एक्सप्रकस**

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था** / ज्येष्ठ मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार, अभिनय सम्राट अशोक सराफ यांना भारत सरकारने २०२४ सालचा प्रतिष्ठेचा पद्मश्री पुरस्कार जाहीर करत त्यांच्या अमूल्य कलात्मक योगदानाचा गौरव केला. राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या एका भव्य समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सराफ यांना हा नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.या विशेष प्रसंगी युवा नेतृत्व व मुंबई उच्च न्यायालयाचे ड. शंकर चव्हाण यांनी ट्विट करत अशोक सराफ यांचे अभिनंदन केले. अशोक सराफ यांच्या पद्मश्री सन्मानामुळे संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. हा क्षण मराठी मनासाठी अत्यंत गर्वाचा आहे, असे ड. चव्हाण यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. हास्य अभिनयातील अप्रतिम कौशल्य, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील प्रदीर्घ व बहुआयामी कारकीर्द, तसेच सहजतेने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा अभिनय या सर्व बाबींमुळे अशोक सराफ यांना हा राष्ट्रीय सन्मान मिळाला आहे.

त्यांनी गेली अनेक दशके 'मराठी बाणा' जपणाऱ्या आणि हसवणाऱ्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. पुरस्कार सोहळ्यानंतर -छख ला दिलेल्या प्रतिक्रियेत अशोक सराफ म्हणाले, ही एक आनंदाची गोष्ट आहे. पद्मश्री हा पुरस्कार मिळणं म्हणजे माझ्या आयुष्यातील एक मोठा गौरवाचा क्षण आहे. पुरस्कार जरा उशिरा मिळाला यावर माझं काही म्हणणं नाही. मिळाला, हीच माझ्यासाठी महत्वाची गोष्ट आहे.ते पुढे म्हणाले, हा पुरस्कार मिळाल्यामुळे जबाबदारी अजून वाढली आहे. मला विश्वास आहे की माझ्या प्रेक्षकांचे प्रेम आणि सहकार्य कायम असेच राहील.



या वर्षातील दुसऱ्या पद्म पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांची उपस्थिती होती. यामध्ये एकूण ६८ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले.अशोक सराफ यांच्यासोबत त्यांच्या पत्नी व सुप्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता सराफ, तसेच भाऊ सुभाष सराफ उपस्थित होते. त्यांनी आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर पुरस्कार स्वीकृतीचे खास क्षण शेअर करत लिहिले, हा सन्मान माझ्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे. महाराष्ट्र शासन, माझे कुटुंबीय, सहकलाकार, आणि माझ्या प्रेक्षकांचे मी मनापासून आभार मानतो. या पुरस्कारामुळे संपूर्ण मराठी चित्रपटसृष्टीत आनंदाचे वातावरण आहे.

'मराठी अभिमान' म्हणून ओळखले जाणारे अशोक सराफ हे खऱ्या अर्थाने मराठी मनोरंजन विश्वाचे स्तंभ आहेत. त्यांच्या कारकिर्दीने असंख्य कलाकारांना प्रेरणा दिली आहे आणि अजूनही ते नव्या पिढीच्या कलाकारांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत.




## कन्नड नगरीत स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/** कन्नड नगरीत स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.या जयंती निमित्य शहरातील वाणी मंगल कार्यालयात भव्य आशा रक्तदान शिबिराचेही आयोजनही करण्यात आले होते.सर्वप्रथम सकाळी ठीक ९वा.भारत मातेच्या प्रतिमेचे व तदनंतर सावरकरांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांचे हस्ते भारतमातेच्या जय घोषात पुजन करण्यात आले. पुढील कार्यक्रमास आयोजक कैलास जाधव भाजपा ता.सरचिटणीस कन्नड,ता.ब्राह्मण सभेचे अध्यक्ष वे.शा.सं.लक्ष्मीकांत पाडळकर शास्त्री व प्रा.लहाणेसर यांच्या उपस्थितीत सुरवात करण्यात आली.यावेळी छ.संभाजीनगर दत्ताजी भाले रक्त पेढीचे वतीने रक्त दान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. त्यात दुपारी १ वाजेपर्यंत एकूण २२ सावरकर प्रेमींनी देश सेवे साठी रक्त दान केले.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून ह.भ.प.संतोष बुरकुल महाराज वे.शा.सं.लक्ष्मीकांत पाडळकर शास्त्री,कालिदास उपासणी तसेच आदर्श शिक्षक शेकर मांडे सह प्रा.लहाणे सर,संजय जोशीसर यांनी सावरकरांनी केलेल्या देश हित व देश सेवे विषयी केलेल्या कार्याचा संपूर्ण इतिहासच

उपस्थितांच्या डोळ्यासमोर रेखाटला या वेळी उपस्थित सेवा संघाचे शरद जहागीरदार,साई देशपांडे,रेणुकादास कुलकर्णी,मकरंद जोशीसर,संजय जोशीसर महेश जोशी,सुनील उपाध्ये शास्त्री,श्रीकांत जोशी,अथर्व जोशी,पत्रकार उदय कुलकर्णी किरण उर्फ नाना शास्त्री



सावरकर प्रेमिनीं भारत मातेच्या जयघोषात परिसर दणाणून सोडला होता.यावेळी दत्ताजी भाले रक्त पेढीचे डॉ. अमर सातपुते, प्रशांत चिटणीस, रेवती जोशी, आरती बामणे, सासुबाई जाधव, विजय पैठणकर वैभव डाक या कर्मचारी वर्गासह ब्राह्मण लासुरकर यांनी कार्यक्रम यशस्वी करणे साठी अथक परिश्रम घेतले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रस्ताविक मयुर राठोड यांनी तर आभार प्रदर्शन शेकर मांडेसर यांनी केले.या वेळी असंख्य सावरकर प्रेमी उपस्थित होते.

## चीन भारताचा क्रमांक एकचा शत्रू

भारताचा क्रमांक एकचा शत्रू पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे असे विधान १९९८ साली भारताचे तत्कालिन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी केले होते. जॉर्ज फर्नांडिस हे अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री होते. २८ वर्षापूर्वी जॉर्ज फर्नांडिस यांनी केलेल्या विधानावर आज अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेने शिक्कामोर्तब केले आहे. या यंत्रणेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात त्यांनी नमूद केले आहे की भारताचा मुख्य शत्रू हा पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे. भारताने चीनशी सावध वागावे. अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेच्या या अहवालावर जाणकार लोकांना आश्चर्य वाटणार नाही कारण आंतरराष्ट्रीय आणि सुरक्षा विषयक जाणकार देखील नेहमी हेच सांगत आले आहे की आपला मुख्य शत्रू चीन आहे अर्थात पाकिस्तान आपला शत्रू आहे यात वाद नाही. १९४८, १९६५, १९७१, १९९९ साली आपण पाकिस्तानशी युद्ध केले आणि पाकिस्तानला पाणी पाजले आताही सिंदूर ऑपरेशन मध्ये आपण त्याचीच पुनरावृत्ती केली. पाकिस्तान आपला शत्रू असला तरी प्रत्यक्ष लढाईत पाकिस्तान भारतासमोर टिकू शकत नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी पाकिस्तान दरवेळी आपली कुरापत काढतो कारण त्यांच्यामागे चीन आहे. आताही पहलगाम हल्ल्याचा संपूर्ण जगाने निषेध केला तरी चीनने त्यावर अवाक्षर ही काढले नाही इतकेच नाही तर त्यानंतर झालेल्या लढाईतही चीनने पाकिस्तानलाच पाठिंबा दिला आणि पाकिस्तानच्या पाठीशी चीन खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही दिली. आता अमेरिकन सुरक्षा गुप्तहेर संघटनेने दिलेल्या अहवालावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भारत हा अहवाल गांभीर्याने घेणार यात वाद नाही. कारण चीन हा किती विश्र्वासघातकी देश आहे याचा अनुभव आपण १९६२ साली त्यानंतर वेळोवेळी घेतला आहे. आताही चीन अधूनमधून भारताच्या कुरापती काढतच असतो. भारताचा सख्खा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दोन वर्षापूर्वी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीनने भारताच्या खोड्या काढणे बंद केले नाही. मागील वर्षी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने भारताशी वॉटर वार सुध्दा सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून त्याने गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. जरी चीनचे लष्करी सामर्थ्य भारतापेक्षा अधिक असले तरी चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे.

**-श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे**

## पशुसंवर्धन मंत्र्यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार : जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे

**आत्ताच एक्सप्रकस**

**जालना (प्रतिनिधी)** गाईंचे पालन-पोषण, संवर्धनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने कल्याणकारी योजना राबविल्या असून गौपालकांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंढे यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी दिली.

श्री गोरक्षण पांजरापोळ गोशाळेत गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ.सुनील सुर्यवंशी यांच्या हस्ते भास्करराव पाटील दानवे यांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्षस्थानी पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल हे होते.पांजरापोळ गोशाळेचे सचिव कैलास बियाणी, कोषाध्यक्ष विजय कामड,



विश्वस्त महेंद्र भक्कड,विजय राठी, संजय लाहोटी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

भास्करराव पाटील दानवे यांनी जालन्यात उद्योजक, व्यापारी बांधवांकडून सेवा भावनेने गाईंची सेवा केली जाते असे नमूद करत पांजरापोळ गोशाळेस आपले सहकार्य राहील अशी हमी दानवे यांनी दिली.

घनश्यामदास गोयल यांनी अध्यक्षीय समारोप केला. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष विजय कामड यांनी केले. कार्यशाळेत विलास तांगडे, उद्धव घुमरे, बन्सीधर आटोळे, गंगाधर सुरवसे, हरिश्चंद्र सूकोसे,गजानन घोडके, विवेक गाढे, विश्वनाथ घोडके, विष्णूकुमार चेचाणी, विजय बोडले, श्रीराम राठोड, भागवत डोंगरे, किसन बरडे, विष्णू आनंदे, भगवान उगले, भरत भांदरगे, रवींद्र मदने, आरगडे यांच्या सह गौशाळा संचालकांची उपस्थिती होती.

## आशासेविका सुरेखा आचलखांब यांना हिरकणी पुरस्कार प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी /** जालना तालुक्यातील नंदापूर येथे कार्यरत असलेल्या आशासेविका सुरेखा आचलखांब (वाकोडे) यांना सोमवार ता.२६ रोजी हिरकणी पुरस्कार प्रदान करण्यात आला.जालना शहरातील जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केला होता. नंदापूर येथे सुरेखा आचलखांब (वाकोडे) या आशासेविका म्हणून कार्यरत असून आशा सेविकेच्या माध्यमातून गरोदर मातासाठी शासनाच्या असलेल्या विविध योजना गावात राबवित



आहे. अशाच प्रकारच्या संकटात सापडलेल्या एका गरोदर मातेची अपरात्री सुखरूप प्रसुती करून आई व बाळाला शासकिय रूग्णालयात पोहचविले होते. त्याचीच दखल घेत उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आशासेविका सुरेखा आचलखांब (वाकोडे) यांना हिरकणी पुरस्कार जाहीर केला होता. त्या पुरस्काराचा वितरण सोहळा सोमवार ता.२६ रोजी जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांच्या उपस्थितीत शाल, मानपत्र, ट्रॉफ ी देऊन हिरकणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याने आशासेविका सुरेखा आचलखांब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## संक्षिप्त

### येळगंगा नदीवरील अतिक्रमण काढण्याची मागणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी**/प्रतिनिधी वेरूळ येथील गट क्रमांक ६९० मध्ये असलेल्या येळगंगा नदीपात्रावरील अतिक्रमण काढण्याची मागणी शेख लतिफोद्दीन इस्माईलोद्दीन यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांना तक्रार अर्जाद्वारे करण्यात आली आहे.या तक्रार अर्जात म्हटले आहे की, वेरूळ हे बारा-वे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेवाच्या पायथ्याशी असलेल्या येळगंगा नदीच्या तीरावर दररोज हजारो भाविक दशक्रिया विधी व इतर विधी पार पाडण्यासाठी येत असतात.गट नंबर ६९० मध्ये काही लोकांनी मोठ-मोठे लॉजिंग,हॉटेल तेथे बांधून अतिक्रमण केले आहे.या लॉजिंग,हॉटेल चे सांडपाणी हे येळगंगा नदी पात्रात सोडण्यात येते,परिणामी नदीपात्राचे पाणी दूषित झाले असून येणाऱ्या भाविकांसाठी स्नान विधी व इतर हिंदू पद्धतीने करण्यात येणाऱ्या पारंपारिक विधींमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे येथे येळगंगा नदीच्या घाटावर दशक्रिया विधी आणि इतर पारंपारिक पूजा अर्चना विधी मध्ये मोठ्या प्रमाणात बाधा निर्माण होत असून येणाऱ्या भाविकांना मानवी मलमुत्र मिश्रित पाण्यामध्ये दशक्रिया विधी करावा लागत आहे.यामुळे भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संबंधित अतिक्रमण धारकांवर त्वरित कायदेशीर कारवाई करून अतिक्रमण निष्काचीत करण्याची मागणी अर्जदार यांनी केली आहे..

### भारतीय बौद्ध महासभा पैठण तालुका अध्यक्षपदी सतीश बोरुडे

**तर सरचिटणीस पदी ऍड.प्रदीप गायकवाड यांची निवड**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिपंळवाडी /प्रतिनिधि/हारुन,शेख/** पैठण येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे. भारतीय बौद्ध महासभा पैठण तालुका कार्यकारणी पुनर्गठीत बांधणी करिता जिल्हा अध्यक्ष सुनील वंजारे ,भारतीय बौद्ध महासभा संभाजीनगर. पश्चिम यांच्या अध्यक्षस्थानी झालेल्या बैठकीस राष्ट्रीय ट्रस्टी डॉ. राजाराम बडगे, राज्य संघटक किशोर जोहरे ,यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पैठण तालुका कार्यकारणी गठीत करण्यात आली. पैठण तालुका अध्यक्षपदी सतीश बोरुडे तर तालुका सरचिटणीसपदी ऍड. प्रदीप गायकवाड यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा पदाधिकारी झोडपे सर, मिलिंद खंडेराव, गंगाराम पंडित ,भरत आठवले, सोमनाथ निकाळजे , बेलवाडी बुद्धविहाराचे अध्यक्ष अरुण दादा बल्हाळ स्वप्निल साळवे पोलीस पाटील अशोक चाबुकस्वार, तात्याराव वाघोसे, पाईक साहेब ,कचरू मगरे ,अशोक पगारे ,अमर भद्रे सर ,दिलीप ससाने, भानुदास चाबुकस्वार, भगवानराव बनसोडे, यांनी स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो - लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उडाण क्रियांना पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि.३ जून दि.१ ऑगस्टपर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे,असे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी आदेश निर्गमित केले आहे.

### पिंपरखेडा येथील जिजाबाई हांडे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**कन्नड तालुक्यातील पिंपरखेडा येथील ५४ वर्षीय महिलेचा शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान बुधवार रोजी सकाळी पाच वाजता मृत्यू झाला. त्यांना अंत्यविधीसाठी पिंपरखेडा येथे आणले असता मयताच्या नातेवाईकांनी आक्षेप घेतल्यामुळे त्यांचे शववीच्छेदन करण्यात यावे यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांना नाचनवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. पिशोर पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रनोती हेडाऊ यांनी शवाविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. जिजाबाई पंडित हांडे (५४) रा. पिंपरखेडा ता. कन्नड असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांच्यावर पिंपरखेडा या मूळ गावी साडेचार वाजेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार किरण गंडे हे पुढील तपास करीत आहे. पिशोर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे .

## तब्बल १८ वर्षानंतर स्नेहसंमेलना निमित्त जमले पुन्हा एका वर्गात



**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर/विशेष प्रतिनिधी /** छत्रपती संभाजी विद्यालय वाकूळणी ता. बदनापूर येथील दहावीच्या २००५-०६ वर्गातील माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन साजरे केले, वास्तविक पाहता दहावीनंतर एकत्र येणे आपआपले सुखदुःख आपल्या बाल मित्रांना सांगणे यात खूप आनंद आहे, त्यावेळी दहावी वर्गातील विद्यार्थी रविशंकर कळमकर,सचिन दिवटे,मंगेश काळे,दीपक खाडे व अंजली हुसे यांच्या संकल्पनेतून एक व्हाट्सएप ग्रुप तयार करण्यात आला यातून दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम केले, शिक्षकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला तब्बल १८वर्षांनी परस्परांना भेटताना सर्वांना आनंदाने भरून आले होते, सर्व विद्यार्थी जमा झाल्यानंतर सुरवातीला शिक्षकांचे फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले त्यानंतर दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, विद्यार्थ्यांनी परस्परांच्या कौटुंबिक व व्यावसायिक माहितीची देवाणघेवाण झाली,प्रास्ताविक मनीषा घाडगे व उषा पालवे यांनी केले, त्यानंतर विद्यार्थी व शिक्षक यांनी मनोगत व्यक्त केले बऱ्याच विद्यार्थ्यांना मनोगत व्यक्त करताना जुन्या काळातील आठवणींनी भरून आले होते,मनोगत व्यक्त केल्यानंतर वर्गातील मृत्यू झालेल्या विद्यार्थी व शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.शाळेच्या स्थापनेपासून प्रथमच एक कल्पक व नाविन्यपूर्ण उपक्रम या तुकडीने राबवला या उपक्रमाची दखल घेऊन इतर विद्यार्थ्यांनी विद्यालयात नवीन सोईसुविधा उपलब्धता होण्यास मदत होईल असे मत श्री खरात यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य नलावडे,तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाकरे , ईश्वर बहुरे, अण्णासाहेब पाटील उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ विठ्ठल शेळके, अनिरुद्ध खांडेभराड, सोपान लबडे, रामेश्वर काळे, कृष्णा लबडे, भगवान पालवे, सुदाम पुंड, सुदाम ढोबळे, रवि डोळे, राहुल मुंडे, उमेश बोंडारे आदी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल हुसे यांनी केले.


महाराष्ट्र शासन

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.**

**जलसंपदा विभाग**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**

E-mail :- ecmillabadgmail.com — दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४१७९

**ई-निविदा सूचना क्र- ०५ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा व ई - निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव व किंमत :- | देवगाव रंगारी बृलपा प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे उर्वरित भरावकाम व पोहोच कालव्याचे काम, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर (रु. १३३.६८ लक्ष) जीएसटी वगळून) |
| २. | इसारा / बायना रक्कम :- | या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIC) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ३. | काम पुर्ण करण्याचा कालावधी | ९ महिने |
| ४. | ई- निविदा संचाची किंमत- | रु. २०००/- + GST १८ % एकूण रु. २३६०/- |
| ५. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :- | **निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार** |

१. ई-निविदा उपलब्ध कालावधी **दि.३०/०५/२०२५ ते दि. ०६/०६/२०२५**
२. ई-निविदा उघडणे दिनांक **: ०९/०६/२०२५ रोजी शक्य** असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

**जा.क्र/लपावि-१/लेखा-३/३६८१/सह**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय.**

**दिनांकः- २७/०५/२०२५**

**स्वाक्षरीत/-**
**(उमेश वानखेडे)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**

- आरओसी-२०२५-२६/क्र-५/C८६०


# खुलताबाद तालुक्यातील प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना मिळणार पाच ब्रास मोफत वाळू आरपीआयच्या राहुल काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील सुमारे अडीच ते तीन हजार घरकुल लाभार्थ्यांसाठी दिलासादायक मिळणार आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे युवा तालुका अध्यक्ष राहुल काळे व सचिव संजय जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तालुक्यातील प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला पाच ब्रास वाळू मोफत मिळणार आहे. येत्या पंधरा दिवसांत वाळू वाटप सुरू होणार असल्याची माहिती महसूल विभागाने बुधवारी दिली.

राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याची तरतूद असून देखील खुलताबाद तालुक्यात याची अंमलबजावणी केली जात नव्हती.हा तालुक्यातील विविध योजनेमध्ये मंजूर झालेले घरकुलचे लाभार्थींना अन्याय दूर व्हावा यासाठी राहुल काळे व आरपीआयचे तालुका सचिव संजय जाधव यांनी तहसीलदार व गट विकास अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.मात्र, प्रशासनाकडून कोणता ही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी थेट जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेऊन हा विषय उचलून धरला.पालकमंत्री शिरसाठ यांनी या तक्रारी संदर्भात तात्काळ दखल घेत खुलताबादचे तहसीलदारांना घरकुलचे लाभार्थींना पाच ब्रास वाळू डिपोमार्फत उपलब्ध करून देण्याचे आदेशित केले होते आवश्यक त्या सूचना दिल्या.त्यानंतर महसूल विभाग खडबडून जागा झाले.व हालचाली सुरू केल्या असून,तालुक्यात वाळू डिपो सुरु करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.खुलताबाद तालुक्यातील लाभार्थ्यांनी पंचायत समितीच्या घरकुल विभागाशी संपर्क साधून आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुकचे झेरॉक्स कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या यशस्वी पाठपुराव्यानंतर राहुल काळे व संजय जाधव यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.बुधवारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत ही माहिती दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ, भाऊसाहेब बनकर, वसंत शिरसाठ, अरुण गायकवाड, कलीम पठाण यांची उपस्थिती होती.

**गटविकास अधिकार्यामार्फत तहसिलदारांना यादी**

पंचायत समितीच्या गटविकास अधिकार्यामार्फत विविध योजनांमध्ये मंजूर घरकुल लाभार्थ्यांची यादी तहसिलदारांना उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तहसिलदारामार्फत ऑनलाईन पास ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे लाभार्थ्यांना देण्यासाठी उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.लाभार्थ्यांने एक महिन्यात वाळू उचलणे आवश्यक आहे.



तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांसाठी ही एक मोठी दिलासादायक बातमी ठरली असून, आरपीआयच्या प्रयत्नांना मिळालेले हे यश सध्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरले आहे.. शासनांनी काढलेले परिपत्रक अनुसारच घरकुल लाभार्थींना मोफत वाळू मिळणार आहे.

वाळू वितरणाबाबतचे धोरण शासनाने बदलेले असून घरकूल योजनेच्या लाभार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे.घरकूलांसाठी सुलभ वाळू धोरण शासनाने अवलंबले आहे.त्यामुळे लाभार्थ्यांना वाळूसाठी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत.कोणतीही रॉयल्टी न आकारता ५ ब्रास वाळू मोफत मिळणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याची गरज नसून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वाळूचे पास उपलब्ध होणार आहेत.

पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यावरुन वाळू लिलावाची अडचण होत होती. त्याचप्रमाणे वाळू चोरी टाळण्यासाठी शासनाने डेपोतून वाळू स्वस्तात देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्यालाही प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. त्यामुळे वाळू धोरणात बदल करुन पुन्हा वाळू लिलाव प्रक्रिया सुरु केली आहे.त्यासाठी नदी घाटांचे लिलाव होणार आहेत.

त्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. त्यासाठीही पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे.पण या नवीन धोरणात शासकीय योजनेतून घरकुल बांधणार्या लाभार्थ्यांना मात्र वाळू उपलब्ध करण्यात शासनाने सुधारीत धोरण अवलंबले आहे. त्यामुळे घरकूल लाभार्थ्यांना वाळू मिळणे सोपे झाले आहे. कोणतेही स्वामित्वधन न आकारता कमाल पाच ब्रास वाळू मोफत मिळणार आहे. वाळू मिळण्यासाठी लाभार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

### प्रतिबंधात्मक आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१चे कलम ३७ (१) व ३७(३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी संगिता राठोड यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.८ जून पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# अर्धन्यायीक व सेवा विषयक प्रकरणांवरील सुनावण्यांना दृकश्राव्य प्रणालीव्दारे प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर विभागीय आयुक्त विजयसिंह देशमुख यांच्या संकल्पनेतुन अर्धन्यायीक व सेवा विषयक प्रकरणांवरील सुनावण्या आज दृकश्राव्य (ऑनलाईन) प्रणालीव्दारे प्रारंभ करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर महसूली विभागातील कार्यक्षेत्रातील ८ जिल्हयातील अर्धन्यायीक व सेवा विषयक प्रकरणांवरील सुनावणीला विभागातील पक्षकार व विधिज्ञांना प्रत्यक्ष उपस्थित रहावे लागते. त्यामुळे पक्षकार व विधिज्ञांचा वेळ वाया जातो तसेच त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. पक्षकार व विधिज्ञांचे वेळ व आर्थिक बोजा कमी होण्यासाठी विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर विभागीय आयुक्त विजयसिंह देशमुख यांच्या संकल्पनेतुन सुनावण्यांना ऑनलाईन पध्दतीने सुरुवात करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने प्रलंबित सर्व अर्धन्यायीक प्रकरणांचा सुनावणी बोर्ड व बजावणी बोर्ड अशी विभागणी केलीजाते. बजावणी आणि सुनावणी बोर्डसाठी वेगवेगळे दिवस दिले जातात.

सुनावणी बोर्डसाठी सोमवार,मंगळवार व बुधवार तर बजावणी बोर्डसाठी गुरुवार दिवस राखुन ठेवण्यात आले आहेत. बजावणी बोर्ड मध्ये नोटीस बजावणी न झालेल्या तसेच कोर्टाचे कागदपत्रे न आलेल्या अपरिपक्व केसेसचा समावेश असतो. बजावणी बोर्ड सहायक



महसूल अधिकारी, महसूल सहायक यांच्या स्तरावर चालतो. सुनावणी बोर्ड व फक्त परिपक्व केसेस घेतल्या जातात, ज्यामुळे पीठासीन अधिकारी व विधीज्ञांचा तसेच पक्षकारांचा वेळ वाचतो. सुनावणी बोर्ड वरील केसेस ३ ते ४ सुनावणी मध्ये निर्णयाकामी बंद केल्या जातात.

निर्णय झाल्यानंतर केसेसचे निर्णय प्रथम एटग उेंीं वेबसाईटवर अपलोड केले जातात व नंतर पक्षकारांना प्रमाणीत प्रती दिल्या जातात. त्यामुळे तक्रारी कमी होतात.

प्रथम टप्प्यात विभागीय आयुक्त व अपर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या कडील अर्धन्यायीक प्रकरणांची ऑनलाईन पध्दतीने सुनावणी होईल. दुस-या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व अपर जिल्हाधिकारी यांच्याकडील अर्धन्यायीक प्रकरणावरील सुनावणी ऑनलाईन पध्दतीने घेण्याचा मानस आहे. तिस-या टप्यात विभागातील सर्व उपविभागीय अधिकारी यांचे कडील अर्धन्यायीक कामकाज व चौथ्या टप्प्यात तहसिलदार यांचे कडील अर्धन्यायीक कामकाज ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे.

# वडोद बाजारच्या आठवडी बाजारात ' वाहतुकीचे तिन तेरा ' सर्व सामान्यांचे हाल ; वाहतुकीची कायमच कोंडी

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** मराठवाड्यात जनावरा साठी प्रसिद्ध सोमवारचा आठवडी बाजार म्हणून प्रसिद्ध असलेल्या फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील बाजार पेठेला पाच रस्ते असून सर्व रस्त्यावर अस्त वस्त उभ्या वाहानामुळे व ग्रामपंचायत आणि गुत्तेदार यांच्या बेजबाबदारपणा मुळे वाहतुकीचा खेळ खंडोबा होत असतांना पोलीस प्रशासन मात्र हाताची घडी तोंडावर बोट ठेवून असल्याने सर्व सामान्यांचे हाल होत आहे .

फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील सोमवारचा जनावराचा आठवडी नकाशा बाजार सर्वत्र प्रसिद्ध असून येथे जनावरांची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणावर होतो . मध्यप्रदेश , इंदौर , उत्तर प्रदेश , आंध्रा , कर्नाटक , मुंबई सह महाराष्ट्रातील कोल्हापुर , सांगली , सातारा , बीड , पुणे , सोलापुर आदि जिल्हयातुन येथे जनावर खरेदी - विक्री साठी व्यापारी येतात . तर फुलंब्री सह औरंगाबाद , सिल्लोड , भोकरदन , जालना येथुन अनेक भुसार व्यापारी दाळ -दाणा खरेदी साठी येतात तर जिल्हयातील अनेक शेतकरी आपला भाजीपाला विक्रीसाठी येथे नियमीत येत असतात . अशा बाजार पेठेला वडोद - फर्शी फाटा , वडोद - जातेगाव फाटा , वडोद - पिरबावडा , वडोद - वडोद वाडी , वडोद ते वडोद फाटा हे ५ रस्ते असतांना बाजार पेठेजवळ वाहने सर्व रस्त्यावर अस्त वस्त उभ्या वाहानामुळे व ग्रामपंचायत आणि गुत्तेदार यांच्या बेजबाबदारपणा मुळे वाहतुकीचा खेळ खंडोबा होत असतांना पो-



लीस प्रशासन मात्र हाताची घडी तोंडावर बोट ठेवून असल्याने सर्व सामान्यांचे हाल होत आहे . बाजार चिठ्ठी व दाखला रोडवरच वसुली सुरु असल्याने या बाजाराला बेशिस्त वाहतुकीचे ग्रहण लागले आहे . येथे कायमच वाहतुकीची बाजार तोंडांशी कोंडी होते . पुलाच्या कोपर्यावर कायम रिक्षा व इतर वाहने पार्क केलेले असतात याकडे पोलीसांचे दुर्लक्ष असते . या मुळे पदचारी - दुचाकी - व बाजार करू महिला पुरुष यांचे मात्र हाल होत आहे वडोद बाजार येथे गिरधा नदीवर अरुंद फुल असल्यामुळे वाहनधारकांना वाहतुकीसाठी अडचणीचा ठरत आहे या ठिकाणी वडोद बाजार च्या आठवडी बाजाराला बायपास म्हणून जातेगाव फाटा ते फरशी फाटा असा एक फुल बनवण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस पदाची जबाबदारी युवा नेते नितीन कुमार जेथलिया यांच्यावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर /प्रतिनिधी** / माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांचे चिरंजीव युवा चळवळीचे नेते नितीन कुमार जेथलिया यांची नुकतीच राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांनी नुकतेच एका पत्रा द्वारे त्यांची सदर नियुक्ती जाहीर केली आहे. मुंबई येथील विशेष कार्यक्रमात त्यांना सदरील नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली.यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष सरकटे, बाबासाहेब गाडगे, जिल्हा परिषद सदस्य इंद्रजीत घनवट, लक्ष्मणराव शिंदे, तारीख भाई सिद्दिकी, दत्तराव पवार, दिलीपराव चव्हाण, उदय नेब साहेब,यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची विशेष उपस्थिती होती.

**नव्या उभारीने पक्ष चळवळ बळकट करणार - नितीन भैय्या जेथलिया**

या निवडीबद्दल परतुर मंठा मतदारसंघासह जालना जिल्ह्यातील व राज्यातील राष्ट्रवादी युवक कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. आपली प्रतिक्रिया देताना नवनिर्वाचित प्रदेश सचिव नितीन कुमार जेथलिया यांनी म्हटले की चला नव्या जोमाने नव्या उभारीने पक्ष चळवळ बळकट करूया या नियुक्तीच्या माध्यमातून सबंध राज्यात राष्ट्रवादी युवा चळवळ नव्या उमेदीने उभारणार असल्याची ग्वाही यावेळी नितीन कुमार जेथलिया यांनी दिली. आजवर केलेल्या कार्याची पावती म्हणून ह्या पदाची जबाबदारी आपल्यावर देण्यात आली असून या पदाच्या माध्यमातून परतूर मंठा मतदारसंघासह सबंध राज्यामध्ये गाव तिथे राष्ट्रवादी युवक फळी हे अभियान



आपण राबवणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सबंध राज्यामध्ये सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आपण कार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. माजी आमदार सुरेश कुमार जिथलिया यांच्या सहवासात दांडगा राजकीय अनुभव असलेले नितीन कुमार जेथलिया हे परतुर मंठा मतदारसंघांमध्ये युवा नेते म्हणून परिचित आहेत ज्यांना जिल्ह्यातही युवा चळवळीमध्ये अग्रेसर असलेले नितीन कुमार जेथलिया यांनी या परिसरामध्ये कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केलेली. आहे.माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेतला होता त्यांच्यासह नितीन कुमार जेथलिया यांनी देखील मोठ्या प्रमाणात युवकांचा फौज फाटा सोबत घेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला होता यानिमित्ताने युवक काँग्रेसची राज्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आल्याचे कळते त्यांच्या या निवडीने मतदार संघातच नव्हे तर राज्यात राष्ट्रवादी युवक चळवळीला मोठी गती निर्माण होईल अशा प्रतिक्रिया कार्यकर्ते व्यक्त करताना दिसत आहेत.

# जालन्यात लोककला प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला परंपरेशी विद्यार्थ्यांना जोडून त्यांच्या मनात या कलेबद्दल आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने जालना येथे सुरू असलेल्या दहा दिवसीय लोककला प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.येथील जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग आणि पिंपरी (डू.) येथील लोकपरिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर २५ मे रोजी सुरू झाले असून ते ५ जूनपर्यंत चालणार आहे.

**सखोल प्रशिक्षण आणि पारंपरिक वाद्यांचा समावेश**

या शिबिरात विद्यार्थ्यांना गण, शाहीरी, गोंधळ, जागरण, वासुदेव, भारुड आणि तमाशा यांसारख्या पारंपरिक लोककला प्रकारांचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे, ढोलकी, संबळ, दिमडी, शाहीरी डफ, टाळ आणि तुणतुणे यांसारख्या लोकवाद्यांचे प्रशिक्षणही या शिबिराचा अविभाज्य भाग आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना लोककलेचा सर्वांगीण अनुभव घेता येत आहे.

**उद्घाटन आणि मान्यवरांची उपस्थिती**

या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या निवृत्त संगीत विभाग प्रमुख सुलभा कुलकर्णी, डॉ. यशवंत सोनुने आणि डॉ. प्रा. वासुदेव उगले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी यावेळी मार्गदर्शन करताना संगीताचे महत्त्व अधोरेखित केले. संगीत हे आपल्या आनंदासाठी आणि मानसिक बळासाठी अत्यंत उपयुक्त आहे. लोककला ही आपल्या मातीतील कला आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांनी या कलेचे शिक्षण घेऊन तिचा वारसा पुढे नेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

**उगले बंधूंचे विशेष मार्गदर्शन**

या शिबिराचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रा. कल्याण उगले आणि शाहीर रामानंद उगले या अनुभवी कलाकारांचे मार्गदर्शन. वयाच्या पाचव्या वर्षापासून गोंधळ परंपरेचे शिक्षण घेतलेल्या या



उगले बंधूंनी 'झी मराठी'वरील 'संगीत सम्राट' आणि इतर अनेक टीव्ही कार्यक्रमांद्वारे लोककला महाराष्ट्रभर पोहोचवली आहे. त्यांचे अनुभव आणि कौशल्य शिबिरातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत मोलाचे ठरत आहे.

शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी दहा दिवसांत शिकलेल्या विविध लोककला प्रकारांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यामुळे, पालकांनी आपल्या पाल्यांना या शिबिरात सहभागी करून लोककलेमध्ये रुची निर्माण करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. यशवंत सोनुने आणि प्रा. कल्याण उगले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.उदघाटण समारंभाचे सूत्रसंचालन आणि आभार शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी मानले.

# जालना जिल्ह्यासह अनेक गावाना मुसळधार पाऊसाने झोडपलं



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनीधी** / मिळालेल्या माहितीनुसार जालना अंबड तालुक्यातील अनेक गावासह बदनापूर शहरासह तालुक्यातील अनेक गावाना मुसळधार पाऊसाने अक्षरशः झोडपून काढायला सुरवात केलीय बदनापूर तालुक्यातील धोपटेंश्वर, पाडळी, पिरसावंगी, हलदोला ढोकसाळ अंबड गाव परिसरात मुसळधार पाऊसाने अक्षरशः जोडपून काढलं आहे. तालुक्यातील अनेक भागात जोरदार पाऊस सुरु आहे. शेतात ही पाणी वाहत असून नाल्याना ही पूर आलंय..

# वडोद बाजार येथे शेतकऱ्याची विहीर ढासळली

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी** / फुलंब्री तालुक्यातील वडोदबाजार येथे अवकाळी पावसामुळे विहीर ढासळली शेतकरी कैलास वाघ यांच्या गट क्रमांक ६९ मधील त्यांनी खोदलेल्या विहिरीत अवकाळी पावसामुळे ढासळले यामुळे या शेतकऱ्याच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शासनाकडून या शेतकऱ्यांना मदत मिळाली अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे परिसरात मागील पंधरा दिवसापासून पाऊस पडत असून काही अवकाळी पावसामुळे या विहिरीजवळ मोठ्या प्रमाणात पावसाचे वाहू आणि वाहिल्यामुळे नवीन खोदलेल्या विहिरीचे या अवकाळी



पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे अवकाळी पावसामुळे विहीर ढासळले बाजार येथील शेतकरी कैलास वाघ यांच्या गट क्रमांक ६९ मधील त्यांनी खोदलेल्या विहिरीत अवकाळी पावसामुळे ढासळले यामुळे या शेतकऱ्याच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शासनाकडून या शेतकऱ्यांना मदत मिळाली अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे परिसरात मागील पंधरा दिवसापासून पाऊस पडत असून काही अवकाळी पावसामुळे या विहिरीजवळ मोठ्या प्रमाणात पावसाचे वाहू आणि वाहिल्यामुळे नवीन खोदलेल्या विहिरीचे या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे शासनाकडून या विहिरीची शेतकऱ्याला मोबदला देण्यात यावा अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे सोमवारी या विहीरीचा पंचनाना पाहणी करण्यात आली यावेळी तलाठी अजित गावंडे यांनी पंचनाना केला.शासनाकडून या विहिरीची शेतकऱ्याला मोबदला देण्यात यावा अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे .



भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल भास्कर आबा दानवे यांचा माजी मंत्री तथा जालना विधानसभेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक सत्कार केला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त जुना जालना येथे भव्य धार्मिक कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने आज जुना जालना मंडळ येथील जागृतेश्वर महादेव मंदिर, पलंग बावडी, इंदिरानगर परिसरात विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मंदिर, घाट व मठ परिसर स्वच्छता मोहिमेने करण्यात आली.

त्यानंतर पारंपरिक शंखनाद आणि मंत्रोच्चारासह भव्य महाआरती करण्यात आली. वेदपठनाने परिसर आध्यात्मिकतेने भारून गेला. उपस्थित भक्तांनी भक्तीगीतांमधून अहिल्यादेवींच्या कार्याची आठवण केली.

भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित माहितीपूर्ण पत्रकांचे नागरिकांना वाटप केले. या पत्रकांमध्ये अहिल्यादेवींच्या दूरदृष्टीपूर्ण प्रशासन, समाजहिताची बांधिलकी, मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी घेतलेले प्रयत्न, स्त्री शिक्षण व सशक्तीकरणासाठी दिलेले योगदान यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले होते.

भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला आणि अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनचरित्र केवळ इतिहासापुरते मर्यादित न ठेवता, आजच्या समाजातही त्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांमध्ये अहिल्यादेवींच्या आदर्श नेतृत्व, निःस्वार्थ सेवा आणि भारतीय संस्कृतीतील योगदानाविषयी जागृती निर्माण करण्याचा मोलाचा प्रयत्न करण्यात आला. विशेषतः युवा पिढीला त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता. या




कार्यक्रमास जालना महानगर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच महिला पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. यामध्ये स्थानिक नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

कार्यक्रम प्रसंगी बद्रिनाथ पठाडे, अशोक अण्णा पांगारकर, सोपान पेंढारकर, कपिल दहेकर, प्रा.राजेंद्र भोसले, महेश निकम, सुनिल खरे, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, सुनिल पवार, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, मनीषा भोसले, विद्याताई कुलकर्णी, सुनंदा बदनापूर, वैशाली बनसोडे, वंदना ढगे, सारिका पाटील, राजेश जोशी, सतीशचंद्र प्रभू, सुमित सुरडकर, सुहास मुंडे, डोंगरसिंग साबळे, मनोज इंगळे, सोमेश काबलिये, रमेश गोगडे, शाम उगले, सतीश अकोलकर, तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी जमिनीचे फेरमूल्यांकन करून बाजारभावाच्या पाचपट मावेजा द्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनीधी/** शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले.यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी शेतकऱ्याची भेट घेतली तसेच शेतकऱ्यांच्या मागण्या जिल्हाधिकारी यांच्यासमोर मांडल्या. यात शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या आक्षेपाबाबत पुन्हा सुनावणी घेण्याचं जिल्हाधिकारी यांनी मान्य केलं आहे.त्यामुळे पुन्हा सुनावणी होऊन शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील अशी अपेक्षा खोतकर यांनी व्यक्त केली



जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी जमिनीचे फेरमूल्यांकन करून बाजारभावाच्या पाचपट मावेजा द्या या मागणीसाठी आज जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं.जालना तालुक्यातील देवमूर्ती गावच्या शेतकऱ्यांनी हे आंदोलन केलं. या आंदोलनात शेतकरी त्यांच्या लेकरा-बाळांसह सहभागी झाले होते.आंदोलना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. सरकार आणि प्रशासनाकडून मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन गनिमी कावा पद्धतीने आत्मदहन आंदोलन करु असा ईशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस/ जालना (प्रतिनिधी)** प्रखर देशभक्त,विज्ञानवादी विचारवंत, भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वबलिदानाने, साहित्य संपदेंने आणि चैतन्यमयी नेतृत्त्वाने शेकडो तनमनांना स्फूर्ती देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे (दि. २८) रोजी साजरी करण्यात आली. प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे जेष्ठ सदस्य सुधाकर भालेराव व नतून माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व वाचक माधव ढाकणे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.माधव ढाकणे मार्गदर्शन करताना म्हणाले कि, भारतासाठी महाराष्ट्रातील सावरकर तेजस्वी तारा आहे. सावरकर अत्यंत कठोर व निर्भिड होते. सावरकरांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. कुणाल सेवलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर उपस्थितांचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी केले. पांडुरंग काळे,कैलासचंद्र सराफ,अरुण जोशी, वैभव गरदास,आशिष उबाळे, प्रशांत गुजर, रावत जैस्वाल, नवल चौधरी यासह वाचकवर्ग उपस्थित होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813